
म. ग्रं. सं. ठाणें
विषय काव्य
सं. क्र. २३७९



REFBK-0022338
REFBK-0022338

काव्य
संदर्भ
२२३३८
२७१४८

(मराठवाडा साहित्य परिषद, औरंगाबाद या संस्थेचे पुरस्कृत प्रकाशन)

२३७९

# आरोह

भ. मा. परसवाळे

REFBK-0022338
REFBK-0022338

प्रकाशक : प्रभाकर मांडे,
कार्यवाह, मराठवाडा साहित्य परिषद,
सन्मित्र कॉलनीजवळ, औरंगाबाद.

©

प्रथमावृत्ती : १८ मार्च १९७६.

मुखपृष्ठ : धर्मराज भोईर.

मुद्रक : ज. रा. बर्दापूरकर,
व्यवस्थापक, जयहिंद प्रिंटिंग प्रेस,
औरंगाबाद.

(या पुस्तकाच्या प्रकाशनासाठी महाराष्ट्र शासनाने सवलतीच्या दरात कागद दिला त्याबद्दल आभारी आहोत).

मूल्य : रु. ७/-

स्वर्गीय कविवर्य रामधारीसिंह दिनकर
यांच्या स्मृतीस

....हळूहळू तुझी
पागोरली वेल
माझा मात्र तोल   जात आहे
तरी केवढी ही
जिद्दीची कुऱ्हाड
गाठीचेच खोड   फोडो पाहे

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क. २२३३८
काव्य
२३५९

## अश्रूंची भाषा शिकवत असेल तर....

अश्रूंची भाषा शिकवत असेल तर
तो ग्रंथ कुठलाही असो; माझा आहे !
विशेषणवार दुःखांची रचना शेवटी कुठवर ?
कुठवर तू; मी, तू, हे, ते, हे असे कुठवर ?
एकीकडे अढळ अमर जडजवाहरांशी दोस्ती करणारे तारे
एकीकडे अंधार, हाडांचे ढीग, खोल गेलेले डोळे
हे तोडताना महदन्तर, या संघर्षात प्रदीर्घ
मी कोणाला कोणाचा म्हणू ?
कोण आपला आणि तुपला ?
या कयामतीत कटणारा विव्हळणारा हात
कोणाचाही असो; माझा आहे !
अश्रूंची भाषा शिकवत असेल तर
तो ग्रंथ कुठलाही असो; माझा आहे !

१९७५

[library stamp]

....यांना जन्नत नाही.

ज्यांच्यासाठी कुठल्याही दारावर उभे मरणच फक्त
असे विद्ध लटकत्या तित्तर बटेरासारखे डोळे
आणि ओठ चूप
असे चुंगेच्या चुंगे, शहरोशहरी
गूळभेलीच्या बोंदऱ्यांचे ढीग
कधी गच्च कधी फैलताना
गंगा–यमुनेचे पाणी आंग आवरून
आणि बेरीच्या ढीगासारखे
मातीशी दोस्ती करीत
हे जित्ते प्रवाळाचे खडक
फुफाट्यातून आगीत
आगीतून फुफाट्यात
आडंग बदलत
यांना जन्नत नाही....

१९७५

२.

मंदिर दर्ग्याच्या पायऱ्यांवर
यांचे आर्त काळे आरोह कधी
हे तपत उन्हात, चिघळल्या डांबर टाक्यासारखे
जागजागी दुखापतींनी चिमून
हे अलक्ष्य आमच्या चिंतनाचे चिरंतन,
प्रवाह : उजेडात तुटून आलेल्या अंधाराचे
दुर्गंधित,
असहाबे सुफ्फा हे
लोळत गल्लीबोळांतून गिजगिज
यांना चोंभाळील असे कोण ?
यांना पैगंबर नाही....

१९७५

## हे स्वर–समूह आणि मी

१.

गळाने पऱ्हरा काढावा तळातून
तसे हे स्वर–समूह उतरतात माझ्यात पुरुसा....पुरुसाने....
माझ्या अंधारमग्न आत्म्याचा माग घेत हळूहळू....ओढतात
नकळत मला माझ्या विश्वातून
मी तुटतो जागजागी
व्याकुळतो.
सत्यवानाच्या प्राणासारखा मी अशरीरी असमंतात,
मी घर हरवलेला कीटक बेजार.
झुलून झुलून थकलेल्या दत्त सैलानीच्या—
भक्तासारखा मी डोळे मिटून शांत
आणि हे स्वरसमूह....

१९७५

२.

चार चौघात, गर्दीत, कुठेही
बेधडक बिलगावे रक्ताने सुकुमार
आपल्या आपल्याला
तसे हे स्वरसमूह मला घेरतात
मी जागच्या जागीच थबकतो, थरकतो सानंद
आषाढात भिजून निथळणाऱ्या वृक्षासारखा
आणि हे कमनीय कांत आकारांचे अलंकृत
अदृश्य काफिले
पाण्याची धार बारीक होत जावी सावकाश
तसे विदा होतात....
आणि मी....

१९७५

## बहर

रद्द हिवरावर बहर
असे ऋतु तर कोणावरही उतरतात
गळ्याखाली कस्तुरीला विकत घेतात
परंतु, डोळेही असतील असे वाटले नव्हते तुला
काठाकाठानं उसवून आभाळ जोडून घेणारे
'जहाँतक घटा चले....' चालणारे....

तळमळ....!

झटून रेतीशी
आणलेले पाणी
गेले निचरोनी
क्षणार्धात

पुन्हा पर्णहीन
झडलेले हात
नुसती उरात
तळमळ....!

## धुपट

डालभर माती
पाहिली धुवून
एकतरी कण
गवसावा !

फुंकून फुंकून
धुपटच झाले
एकही पेटले
नाही खोड !

## सगळं सगळं झालं असतं

इलाजच खुतले सगळे
इतक्या बुजून गेल्या वाटा
नाही तर....
मीही घेतले असते उधळून
हे रंग कल्लोळ चौक आरशा आरशावर
खरीदली असती ह्या बेदर्द दुकानातील
सगळी चकाकी....
तुझ्या गाडग्यामडक्यातून टाचोटाच भरण्यासाठी
सगळं सगळं झालं असतं
तर्जनीवर डोंगर धरला असता
जर डसला नसता अंधार असा जागजागी
दिवस आजचा काल हारला नसता

१९६८

## आज

उरलेल्या उन्हाच्या चिरोटीत
हाडकत पडलेलं शेण....कसं उदास
साले, आज कालवेही नाहीत ढगांचे
आणि सावल्याही नाहीत
आता कुठे करावीत कंपोज
ही धवळारे मनातील, हे सोनेरी कळस
हे न्यावेत कुठे आरसे नितळ
या धावा उखळून टाकणाऱ्या
बेदिल खडखडाटात, धुळीच्या लोटात
गच्च झालेले डोळे,
बाद झालेले किलकिलाट........

मी हळुवार झालो नाही कधी, तरीही....

आतड्याच्या जोगण्या करून बांधत असशील तिथे माझ्याभोवती
मला तसे सावली होऊन पडता आले नाही काट्या कुपाट्यांवर
कदाचित् हे वय....तसे असावेही या काळात....
थोडीशी बेमुर्वत....बेछूट सगळे....
सगळ्यांनीच सोडलेले असतात जवळजवळ श्यामकर्ण
अश्व मेधास्तव
तरीही बघ, कवट्या फुटाण्यात इतका जाळ उठत आहे आत...
या पिढीनं कैक मैल मागे लोटलेले
वाळवंट पिऊन बुडाला लागलेले तुझे डोळे
लिंगाकारासारखे मी गळ्यावर धरले आहेत.
कोणती शप्पथ घेऊ मी....मला हेही कधी जमले नाही, पण....
कदाचित तुझी भेट झाली नाही तर....म्हणून म्हणतो....
येशूख्रिस्ताला काय वाटले असेल त्या दिवशी....

त्याला वाटलेही नाही म्हणतात
त्याने ईश्वराजवळ सर्वांसाठी करुणा भाकली
निंदण्याखुरपणाऱ्याकडून एवढे महान...नकोही आहे मला
कारण हंबरडे, आक्रोश, आघात हेच तर तुझे जीवन आहे.
....तर, तर तू तसे समजू नकोस !
तुझ्या शेवटच्या त्या अस्पष्ट नजरेवर
पाखरे कशी तुटून पडली आहेत माझी
मी हळुवार झालो नाही कधी, तरीही....

१९७१

## पारधीण

उन्नत बहर
नत पदावर
तरी दृष्टी दूर
काननात
सुटलेल्या झिंज्या
मोकळे उरोज
मुखावर ओज
गोंदलेले
पाठीशी झोळीत
बांधलेले पोर
बोलणे मुज्जोर
शिरजोर
कुम्मट चिंध्यात
गाठलेले सोने
उन्मादाचे लेणे
तिचे रूप

१९७०

हे असे बस् हे जसे....

स्वतःच स्वतःची समाधी व्हावं असे क्षण....
तासन् तास जुटू नये असे फुटणे....
मी....मीच....मीच मला शोधणे....हे काय ?
काय हे....
हे असे आघात !
इतक्या स्वस्तात बर्बाद होणे....
हे काय....हे काय
कुणी सांगावं हे काय
हे काय तुटूतुटू...तुटून येणे
आवरणे....आवरून बरळणे आग
आगीत चक्क राख होणे....
हे काय ?

'हे काय'— हे एवढेच पुरे....
पुरे हे असे गुदमरून मरणे....थोड्या थोड्याने
उखरणे आकाश निरुद्देश
निरुद्देश चिवडणे....चिडणे....
चिडून चिरडणे स्वतःला....स्वतःलाच गिळणे....
गिळून उकलणे....उकलून फेकणे आकाशभर
स्वतःला स्वतः
हे असे बस् हे असे....
'असे' असे नाहीच काही
काहीही करणे कुठेही....
कुठेही... काहीही
हे असे.... बस् हे असे.

१९७१

## कल्दार नाणे

घानीमानी घानीमानी
भिजे भोंगळ्याने ऊन
असा अवचित क्षण
मोहरेच्या संगे
जळतसे सूत
अशी एखादीच रात
एखाद्याच काचोळीत
वाजे कल्दार नाणे
जिथे फिटते पारणे

१९६८

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
२२३३८
वा. क्र. काव्य
२३७८
ग्रंथ शाखा (स्थळ प्रत)

हंगाम

एखाद्या ढगावर स्प्रेड होऊन संपेल सूर्य
तेव्हाची दौलत सोडली तर
कसा नर्व्हस हंगाम....
टायर झिजवीत दम काढणारे उदासीन हात
आणि नजाकत असूनही फुलांची शिरावर
गळाठलेले रूपडे, गाल्यागाल्यावर
राख होणारे यौवन
यार, सगळे दाबून ठेवावेत आता
गिरसप्पाचे धबधबे....
कसा नर्व्हस हंगाम

## दोस्ताने

चाड्यावर मूठ ठेऊन केले दोस्ताने आम्ही
पाखरं फुकट आणली सावलीला झंजटी निस्तरून
एका एकानं सगळ्यांनीच उचलला गाभुळताना पाय
फळं कच्चीच नेली झाडून घराचे फिरताना वासे
कोणावर ओवाळावा जीव ?
कोणावर करावी आसवांची बरसात ?
शेंडे विसरून जातात
झिजत चाललेल्या मुळाचं नातं
कधी कधी फांद्याच वृक्षाच्या दैन्यावर दूर जाऊन हसतात

## आठवणी

आठवलेल्या आठवणी अजून संपत नाहीत..
चैत्राचं स्वागत कोळ करून तळपणारा सूर्य
रोज....अगदी ह्याच वेळीं
कमळांचे कळे मुर्गाळीत
आणि....दूर....आकाशात
मुका मार गिळगारे ढग....उठता उठत नाहीत
करवट बदलतात....आणि मोगऱ्याची नाराज पानं
आणि आठवणी संपत नाहीत
खोऱ्याखोऱ्यानं किंवा कुठे अचानक
साखळी करून वाढलेले बेहळे अधोमुख
हटता हटत नाहीत तोरणं पिवळ्या पाकळ्यांची
एखाद्या लाजवंतीचे डोळ्यांवर येणारे लागट केस....
तसे पाण्याचे पाट कुठले कुणास ठाऊक

पीत असतो दिवस....ऊन उतरेपर्यंत
ओंजळ भरलेली असते
आणि आठवणी संपत नाहीत
वाटा....तारा वीज वाहून नेणाऱ्या....
डोळ्यांत स्पष्ट होत असतो अंधार
कल्पना असते फक्त
पुन्हा मन संस्कारित देवालयांनी....दगडांनी....जुन्या खूप जुन्या
झिरपणारे पहाड.... फोडून काढलेले
थोडासा हिर्वळतो सूर्य....
आणि मी पाहतो शहाजहानच्या डोळ्यांनी बिबीचा मुकबरा
अगदी लेण्यांतून....त्या अंधारात बुडवून स्वतःला
छुमछुमाट गळत असतो वरतून साळुंक्यांचा
त्यांच्या पायावर पंखांवर वाढलेले अधर वेल
तिथल्या उघड्या दगडांनाही ऊन लागत नाही
आणि आठवणी संपत नाहीत.

## बाघच्या गुंफा

सगळा बाजार पालथा घालून
मी झालोय माझा परदेशी
ही गर्दी....हे रस्ते
आता लवकर लाईनही मिळणार नाही
मी मला बोलू इच्छितोय फोनवर....
....अशात ह्या बाघच्या गुंफा....सहगामिनी
साद घालतात हळुहळू....अंकुरतात
चरड खोडावर चांदण्या मूळ धरतात
आणि मी मला भेटतो
मी माझ्यात सामावून जातो
ह्या बाघच्या माझ्या गुंफा
मला कवटाळतात कडाडून
आणि हे निळे चिव्चिव्णारे डोळे : ह्या कुऱ्हाडी
खटाखट तोडतात आमचे अस्थिबंध
आणि आणतात मला ओढून फरफटत
या इथे काळ्या पाण्यावर स्मशानात
माझ्या बाघच्या गुंफा
या काफिरांना चुकवून येतात थोड्या थोड्याने
आणि माझ्या खाचांना देऊन जातात डोळे....
माझ्या बाघच्या गुंफा.

१९७०

## काठाकडे

घावांनी चिघळलेल्या साली फेकून दिल्यात
चिघळत असतील त्या
मी आता नवा झालोय....आत्ताच जन्मलोय
माझ्या शरीरावर वाढत चालला आहे
प्रशांत महासागर आकाशाकडे
मी सुखासीन किलकिल्या डोळ्यांनी....
अदृश्य धाग्यांनी सुतवीत चिमण्या भिर्कत आहेत....मला
धाग्यांच्या स्पर्शागत मी उतरत आहे
माझ्यातून माझ्या आपलेपणात
मी....आता नसेनच....असा काठाकडे....

## रुखरूख

ढेकळागत इघरून गेलं कपाळाचं कुंखू
गुदमरून गुदमरून मेलं उरातलं दूध
तकदीरानं असं काही लुचलं कठोर
वाया गेला भोळ्या डोळ्यानं बाळलेला ऊद
रास तेवढी उडाली उरलं किरकिरीचं कुटार
उपडून फेकल्यावरय पीलं फुटणारं दुख
ईळ जातोय माळाखोळानं हिंडणाऱ्या व्हलीसारखा
रात, बार भरल्या भोईला लागलेली रुखरूख

## नवे मोर्चे

येत्या कित्येक सूर्यांचे लंगर डोळ्यांत बाळगणारे पट्टे याही पूर्वी ओरडले
हवा झाले शब्द, पायांनी बळकावले तेवढेच आले
आजही तीच धुमश्चक्री; तू काय आणि ते काय
सगळ्यांचेच शब्द, टाळ्या कडकडाट हार तुझ्यावर आबाद झाले.
आतडें खेचणाऱ्या शब्दांचे दर्शन घेणाऱ्या फकिरा
बेगुन्हा आत्म्यांचे टळटळांट सांगणारे जित्ते गाथे
एक टमरेल, एक काडी आणि चिध्यांवर आम्हीच जाळले
तर पुरे हे शब्दांचे अस्ली अगर नकली थोतांड
नवे मोर्चे आजवर जातीने रक्तानेच बांधले

## मी इथे बेइमान तुझ्याशी

मी इथे बेइमान तुझ्याशी
मातीच्या गतीचा गैर फायदा घेत
आकाश बडवीत बसलो आहे
तुझ्या डोळ्यांनी सोडून द्यावा साहिलचा पिच्छा
ईश्वर करो
मी बांधले आहेत माझ्या मंजिलचे कयास
तू मृत्यूच्याही पुढचा प्रवास करणारा ठरशील
तुला सोसवणार नाहीत हे बैरागी इरादे
तू मातीच्या भट्टया पेटवीत आणल्या आहेत
वेशीपर्यंत
अग्नीला भग देऊन प्रत्येक दिवस
आता तुझा निर्जीव साटाही
कूच करील इप्सिताकडे
ईश्वर करो
मी इथे बेइमान तुझ्याशी.

## अंधार. १.

खाटकाच्या दावणीला बांधली जात आहेत सगळी तत्त्वे सुंदर
दुष्काळातील निराश्रित दीन ढोरांसारखे आदर्शांचे सापळे
मृत्यूची मोहोर वागवीत शेवटचा दम काढत आहेत
आणि अंधार हरीकेनच्या वेगाने धावत आहे
लाखो वर्षांच्या उत्क्रान्तीवरून हात फिरवीत
न्यायालये, संसदभवने बुजत चालली आहेत आत
प्रतिभेचे अत्युच्च कळस दिसेनासे होत आहेत
मी विझवल्या जात आहे चोहीकडून अंधाराने
माझ्या श्वेताभिमुख पेशींना वेचून ठेचले जात आहे.
अशात कुणाला सूर्य सापडला असेल त्याने इकडे यावे.

१९७३

## अंधार २.

लाकडाच्या वाहतुकीसारखी
माणसे फेकली जात आहेत इकडून तिकडे
हवे तसे त्यांना तासल्या जात आहे,
कापल्या जात आहे
व्हेसुव्हियसहूनही भयानक माणसांकडून
माणसांचेच सजीव कोष उकळले जात आहेत
आणि
नव्यतम व्यवस्थेचे दिग्दर्शन करणारे भीरू विद्यासागर
केवळ खुराकासाठी खुशाल पत्र्या ठोकून घेत आहेत
आणि अंधार ? अंधार सरकत चालला आहे
भविष्यावर
कोवळ्या अति कोवळ्या
अशात कुणाला सूर्य सापडला असेल तर
त्याने इकडे यावे.

१९७३

अंधार ३.

बाहेर शब्दांच्या ठिणग्या, आग, इन्किलाब
भाषा नये निर्माण की
आत स्वतःचाच आकार शिवत बसणारे मजबूत
स्वतःला स्ट्रोक बसण्याच्या धास्तीने
आपल्याच काफिल्यावर एखादी गोळी
झाडणारे महाभाग
मी पाहिले आहेत उंचीच्या चरमत्वावरून
किताब घेताना बडे बडे
आणि घोडे इथेच आडत आहेत मित्रांनो !
आणि अंधार तुटून पडत आहे
न्यूक्लियसवर मानव्याच्या
बेफाम वेगाने
मी चकतो आहे सारखा पड्यावर, पोष्टरावर
अशात कुणाला सूर्य सापडला असेल तर
त्याने इकडे यावे.

१९७३

## सूर्य

बंद बॅट्रीत जळत राहावा मसाला आतल्या आत
तसा सूर्य ढगांच्या आड
त्याचे कुठले संदेश नाहीत
त्याची आहट नाही
' प्रिय प्रवासा ' तील माधोसारखा
तो दूर
आज त्याच्या दर्शनासाठी
डोळे राधा होऊन तरफडत आहेत
ओले पंख घेऊन पक्षी फांद्या बदलत आहेत.

१९७२

इथे फक्त पार्थिवता कॉमन आहे.

१.

हो, हे मान्य की, प्रत्येकाचे आपले तत्त्वज्ञान असते,
आपला विचार
तू गीता पचवली असशील अगर कुठलाही धर्मग्रंथ
तुला कुंडलिनी करता येत असेल जागृत
निःशब्द मार्ग स्वीकारून ब्रह्मवलये कवटाळण्यासाठी
तू जा ! सारे तथास्तु म्हणतील
पण अर्थ आटवले जात नाहीत जोवर आत
आणि संपत नाही विघटन क्षमता विचारांची आतल्या
तोवर या नादवाही समजुतींवर, या विक्षेपांवर
तू ठेवू नकोस तुझी स्वतः छिलून टोकदार केलेली बोटे
कारण दिसताहेत— ती Relations झूठ आहेत
आणि मन नेहमीच पार असते बंधनाच्या नैतिक एवं कुठल्याही

२.

बुद्धाला स्वप्ने पडली असतील महाभिनिष्क्रमणानंतरही संभोगाची
कदाचित्,
कदाचित् कृष्ण घसरला असेल द्रौपदीवरून सूक्ष्म स्तरावर
बोतलभर प्यायलाच पाहिजे असे नाही
मन एक पहिलाच मयखाना आहे—
ते तुझे काय, फ्रेंच पॉलिश पिणाऱ्यांचे काय अन् मनीषींचे

कधी तरी फक्त माणसांचे संभोग फक्त स्त्रियांशी
आजही पाहा तू थोडा वर जाऊन
जिथे धरेवरच्या ध्वनी लहरी मुंड होत जातात पूर्णपणे
खाली केवळ माणसे आणि स्त्रिया दिसतील, सत्य !
मग इथे रसेल मूर्ख ठरेल
इथे मनू श्रेष्ठ ठरेल
इथल्या बाचाबाचीला Constitution वगैरे म्हणूत
हजारदा चाळून समूहात स्वतःला, सवसारखे होऊत
आणि मग बायको, आणि मग बहीण, आई.... वगैरे
तर हे वाईट नाही

४.

'Live and let live'
'दारुबंदी सप्ताह'
'वन्य प्राण्यांचे रक्षण करा'
'पर नारी.......'
पण मन सटकत असेल यांतून
कुणाचा विश्वमित्र होत असेल
कुणी जाळून घेत असेल स्वतःला
नवसागर ओतून पोटात
कुणी भाड खाऊन जगत असेल मजेत
तर तू तिथे जा !
जिथे ध्वनी नाहीत,
जिथे Constitutions नाहीत

तुला काहीच वाटणार नाही
आणि माहीत आहे तुला
आपण नेहमी तिथेच असतो

५.

आपल्याला भाकर हवी असते— ती कुणाचीही असो
'तायरे— लाउती....परवाजमें कोताई'....वगैरे
याला अर्थ नाही आणि संभोग—तात्पर्य
स्वतःला आग लावून धीरे धीरे समाप्त होण्याचा नाद
अमिट आहे
आणि तेवढ्यासाठीच आपण पाणी कापीत आहोत
एकात एक असंख्य सागर
एकात एक असंख्य हात—
हातांनी सत्कार, हातांनी बलात्कार... विकार
किती तरी भले आणि बुरे

६.

सागरांच्या सीमारेषा घुसतात जेव्हा एकमेकांत
तेव्हा आपण ओरडतो की,
मुक्ती शून्यात नाही
माणसाचे कोलगड्डे भाजणाऱ्यांना उभे जाळा
गटार गाळल्यावर नीट त्याचेही आबे-जमजम होईल
अल्ला पैखान्यातही उतरतो.
माणसांना मशिदी द्या राहण्यासाठी

त्यांच्यातील अमोल जीन्स उघड्यावर उकंडा होत आहेत
किंवा
माणसे झोकून........झोडत आहेत तत्त्वांना
स्वतःच्या बरगड्या मोजत आहेत
त्यांनी सितार घ्यायला पाहिजे होती हातात
स्वरातून आबूची जैन मंदिरे कोरण्यासाठी
त्यांनी कुर्बान व्हायला पाहिजे होते
अजिंठ्यावर सिस्टिन चॅपेलच्या चर्चवर
त्यांनी आंबेडकर व्हायला पाहिजे होते सावरकर
वगैरे वगैरे.

७.

ह्या अपेक्षा तुझ्या तुझ्याशीच पॅरलल् असलेल्या
मिळणार नाहीत इतरांच्या Central vision वर
कारण इथे फक्त पार्थिवता कॉमन आहे.
बाकी, एकमेकांच्या देहावरून एकमेकांचे रस्ते काढणाऱ्या
शिदोडांचा बुजबुजाट हा.
तू तुझी स्वतः छिलून टोकदार केलेली बोटे
तुझ्यावरच ठेव
आपण आपल्याशीही पॅरलल राहूत हरघडी असे नसले
तरी शक्यता आहे.

## अंधार चिवचिव्ण्या आधीच

अंधार चिवचिवण्या आधीच काळानं डागलेले सकाळचे इळास
पळून पळून रात्रीच्या कुडकुडत्या काठावर
वळवून आणलेले घामाघूम वैराण दिवस
....आणि लुटल्यावर ललाट
चरे पाडून पाडून काचकोरांनी
खर्चटून टाकलेले गालावरचे निष्कलंक चंद्र
आज गोंदण हरवल्या हातांनी
उजवताना एक एक हात
तू जेव्हा कलतेस त्या धगधगत्या माळावर
सहजच कविता होऊन जातो
तुझ्या भरल्या डोळ्यांतील
एक एक अनवाणी थेंब.

## ध्वनिविहीन

घनदाट अरण्यातून उतरावेत उछलछलांग कळप
काळविटांचे रस्त्यावर आम
तसे माझे सोबती : माझे आनंद सिक्त मी
माझ्या दुनिया तारेवरून
शिराळासारखे सरकत गेले पुढे पुढे पुढे....
मी शोधल्या अवकाशात त्यांच्या रंगावली
नृत्योत्तर फेकलेल्या घुंगरांतून बहकलेल्या रंगलाल मैफिली
व्यर्थ
मी पुन्हा ध्वनिविहीन या नेहमीच्या वेशीत
तुमचा, त्यांचा
गटागटात जखडलेल्या स्वत्वहीन दगडांचा
आता चर्चा, चित्रे, ग्रंथांच्या गडावर चढणे;
शब्दांचा वेळ पाहून माफक कीस पाडणे
चेस हटवणे आपल्यावरून
शक्य तो दुसऱ्याच्या घरावर फात्या पढणे.

दुखरे दगड.

संपत आलेल्या सिगारेटला
धरून ठेवणारी ही बोटं
बिस्तबाच्या काठावरून
अलगद धूर उचलू पाहणारे हे ओठ
अटळ आहे नाही याच बोटातलं
चुरगळून टाकणारं कठोरपण
किंचित उदासल्या ओठावर
नव्या कुर्बानीचा उदय
सारं तेच रंग राग झंकार
झुंबरांतून झळाळणारा तोच रंगेल प्रकाश
इतिहास सांगण्यासाठी काळानं धुडकावलेले
फक्त दुखरे दगड
कुडे उनाड हातांनी उखरलेले
दुर्गातील उध्वस्त महाल

## किती चिरावं आकाश

नाभीच्या देठापासून स्वर ओढले
शब्दाशब्दावर आतडं फाडून काढलं
तटतट तुटोस्तोर हिंजाडल्या तारा
तरीही शौकीन म्हणतात, ' जरा अजून चांगलं '
वाळू उखरून दमलेली जीभ
आधण जळणारं लागलेल्या पोटात
किती चिरावं आकाश भाजलेल्या स्वरांनी
कशी काढावी काट्याच्या आणीवर रात

## एक चित्र

वाळला कुपाटा कडंवर घेऊन
वाकलेलं एक उदास बाभुळ बूढ
मोकाट खुरांना रक्ताळणारी
भवतालची भकास भेगाळ जमीन
जवळच वाटंच्या काठावर
उसवलेला एक वाकळवजा पार
आवसं पुनवंच्या तोडग्याताडग्यावर
जगणारा दरिद्री देवपण

## मगरीबचा बंदिस्त सूर्य

आषाढस्य ढगांनी
ग्रासलेलं आभाळ
मातून गेल्या मनाचे
अक्राळ विक्राळ थर थरावर
धूळ धुमाकूळ जिकडे तिकडे
पक्ष्यांची कतार तार तुटून थरारणारी
थाकणारी फांदी मरणाच्या अंत:समयावर
पानांचे मर्सिये....
दूर मगरीबवर
झुकलेला बंदिस्त सूर्य
सुळक्यांवर डगरींच्या
ओघळणारी जफरची पांडुर विराणी
आणि मी बघतोय या अशात
माझे तुटलेले हात
डागलेल्या डोळ्यांनी

मग सगळे मयखाने आपलेच आहेत

सगळी व्यासपीठं आणि सगळ्या गल्ल्या
भूषवून घरी परतल्यावर
जेव्हा गळून पडतात शायरे आवारा मिजाज
तेव्हा सात समुद्राचे अंतर असते
कैफ झालेल्या कालिदासाचे
अविभाज्य झालेल्या संश्लिष्ट कवितांचे
तेव्हा कुणीच आठवत नाही
आठवले तरी जात लागत नाही
अशावेळी दुर्डीत भाकरी असाव्यात निदान
कारण खऱ्या पिद्दकडाला
हा शेवटचा उपाय आहे
पुन्हा उद्या बहकण्याचा
....आणि डोळ्यांची साखळी ?
गिट्टी रगडण्याइतकी मजबूत असावी

बिनधोक, बेडर
म्हणजे झाले
मग सगळे मयखाने आपलेच आहेत
इंद्राला लाजवणारे सगळे रस्ते
आपलेच आहेत.

१९६९

किनारे नसलेले ते क्षण.

राहून राहून अंधारून येणारं आभाळ
त्याच्या नितळपणी किती बेहोश असतो मी
असं वाटतं तू अमृत पिऊन आली आहेस
आकाशाचा नीलिमा लेऊन आली आहेस
....आणि मग शेवटच्या शिरेपर्यंत
छेदत जातो तुझ्या अस्तित्वाचे गर
दिक्कत वाटत नाही तेव्हा माझ्या मातीच्या
हातांना
वसंताचे हिरण्मय संसार शिलगवताना
शेंडे इतके हिरवे असतात
रंग इतका मदहोश असतो
किनारे नसलेले ते क्षण
हा काळ जेव्हा हाकारून आणतो
आकाश झाकाळून आणतो
माझ्या सगळ्या नावा बुडत जातात
ते कठोर घात आठवत जातात.

१९६९

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
२२३३८
काव्य
२३४९
शाखा (स्थळ प्रत)

## माझे रस्ते नाहीत आणि माझे घर नाही

निस्टत नाहीत माझ्या नजरेतून
दफन झालेले मोहेंजोदारोचे रस्ते
आणि कुहरांना मागे टाकून
रस्त्यांच्या काठावर जमीनदोस्त झालेली
सुसंस्कृत घरं
निस्टत नाहीत मी रोज आठवतोय
झाडाभोवती खत होऊन पडलेले
अनंताचा वेध घेणारे माझे पूर्वज
आणि बिनदिक्कत फिरतोय तुमच्या या रस्त्यावर
मदिरेत सराबोर झालेले अंग घेऊन
हे रस्ते, रस्ते ? केवढा संभ्रम
रस्ते नाहीतच
सगळी जमीन पसरलीय
जमीनच आहेत ह्या घरांच्या रांगा
आणि मी जमीनीवर फिरतोय.

मी मोडले नाहीत कुण्या रस्त्याचे अधिनियम
आणि बाटवली नाही कुण्या घराची सावली
मी फिरतोय या जमीनीवर मासाचे
कच्चे तुकडे चघळीत
....प्रतिष्ठा ? प्रतिष्ठा : शद्बांनी व्यक्त
केलेला अनिर्बंध अवकाश.
अवकाश असंख्य आकार घेणारा
घ्या काढून
आपली आपली नावे या शून्यात, घ्या !
मी डोळ्यांत तेल घालून पाहतो आहे
मातीचे जबरदस्त साम्राज्य
आणि फिरतो आहे या जमिनीवर
हवे तसे खात आणि पीत
माझे रस्ते नाहीत आणि माझे घर नाही.

१९६९

## या अनंत चक्रात

लोळून लोळून कालौघात
माती होणारे हे आरसे, हे आकार
सुकुमार, सुंदर, भयंकर
आणि त्याच मातीतून मोहरणारे
हे रसीले रससिक्त बहार
या अनादि अनंत चक्रात
तुला तरी माहित आहे तू केव्हा काय होतास
आणि पुढेही काय असशील ?
तुला चिरडून करता येईल
रंग आणि कागद तयार
आणि हेच रंग, कागद दूर दूर जाऊन
होऊ शकतात परिणत
रक्तात रेतात
आणि मग कशात नाही
इथं कुठंय तुझा वेगळा चित्रकार

तुझा कवी, तू, तुझा अहंकार ?
अरे, सांग या अनंत चक्रात कुठयंस तू ?
कुठयंत तुझी पावलं ?
हा ओघ निःसीम
भ्रमिष्ठा, या ओघात या असंख्य विक्षेपांत
तू फक्त पाणीच असू शकतोस
फक्त पाणी !
थेंब नाही आणि तुषारही नाही !

## या क्षणी

या क्षणी जगातील सगळे वेग आणि प्रवेग
कमीच ठरतील
इतका दाटून आलो आहे मी आत
अनंतात झेपावून समाप्त होण्याची आकांक्षा
इथे गारद करील असे जहर नाही
हर्रास करील असा प्रकाश नाही
मला वाहून नेतील असे शब्द नाहीत
असे रंग नाहीत
पृथ्वीच्या गर्भातील बेचैन लाव्हासारखी
माझी मूर्धन्य प्रक्षेपणे झेलील
असे कोण आहे ?
मी दाटून आलो आहे आत.

१९७१

प्रार्थना

आपणच आपल्याला तोडून जोडत जावे दमदारपणे
स्वतःचेच दादरे होतात.
बाहेरचे पूल पैलतीरासाठी झिरो आहेत
सावल्यांचा शोध घेणारे द्रष्टे डोळे नवे नाहीत
असे कित्येक ऑफ झालेत मक्केवर, मदिनेवर, पर्वतावर
त्यांच्या समाप्तीच्या वेळी फक्त चंदन आकाशभर पसरले
माणसांना झाकील असे पाल पडले नाही
आजही किबला बदलून प्रार्थनांनी तोंड फिरवले आहे.
आणि जप्त हाडे नवा अध्याय उतरेल म्हणून
स्वतःला कुलूप लावून सिज्दा करीत आहेत
या अभिसरणबंद देहाचे भले होओ

१९७१

## डोळ्यांचं भिकार

डोळे : डोळ्यांची वाहती गंगा
आपले म्हणता येतील असे डोळे नाहीत
पाखरासारखे येतात आणि जातात घागर भरली की
वाळलेल्या ओठांची रांग असते
तेव्हा ती साथ बरी वाटते
अंतर्मुख झालेल्या पायथ्याच्या ओढ्यांची, गोट्यांची
....आणि खडीच्या सावल्यात
क्लान्त मनाला नेता नेता सोडून देतात
सगळे महाकाय स्तंभ गुंफाचे
तरीही शंभर वेळा जाऊन येतो मी एका अर्ध्या तासात
डोळे पसरवतो, रुजवतो
चित्रांतून पाषाणांतून
लुटतो रंग....तरीही प्रवाह खंडत नाहीत
नवे नवे सानुले डोळे येतात, भीक मागतात
आणि मी अपुरा पडतो

ते ओरडतात
थकतात आणि पुढे सरकतात वैदूसारखे
तरीही नवे डोळे नाउमेद होत नाहीत
येतच राहतात आणि मी बघत राहतो
सुटलेलं डोळ्यांचं भिकार.

१९७१

## तू येशील

तू येशील उद्या
थोडे थोडे हिर्वे झालेले हात घेऊन
धारेतल्या पाण्यापासून
सांभाळून कुर्वाळून ठेवलेल्या
सगळ्या सगळ्या सावल्या
माझ्याजवळ उंडायसाठी
निवळायसाठी
माझ्या वळुया इर्खंडाचा भित–आंधळा धूर
परागभर न लुटणारा तू
उद्या येशील माझ्या राजा
सारा फुलांचा खच आपलाच समजून
तू येशील उद्या
थोडे थोडे हिर्वे झालेले हात घेऊन.

१९६९

दान

खुडून खुडून स्वतःला
मी नुसतंच ठरवलं व्हायचं बर्बाद
पण वाढलेल्या भिकेतय
गोंडरच फार निघालं
सहजच भेटलास तू
रक्तचिंब वाटेवर
हासत हासत
ओसाड घरावर तोरणं बांधताना
सहजच मीही अडकलो
तुझ्या अैचन–उथळ येडया–इद्रया काठावर
वाहून वाहून थकलेल्या फुर्सनासारखा
कुठं मी माझं काहीच नसलेला
विजेचा आगवाहू खांब
कुठं तू, मोहरण्याची मातब्बर स्वप्नं पाहणारा
वाळूवरचा दिवा
तरीही तू पालवलंस मला

माझी आग घेऊन आपल्या शिरावर
आणि मी ?
मी तुला जाळत सुटलो
खुशाल जितकं जाळता येईल तितकं
तुझं हिर्वेपण हलकं करीत

१९६८

तू एक माणूस

जाळून टाक ह्या साधूंच्या प्रतिमा
हे संच ग्रंथांचे गंभीर
सूचित करणारे तुझं
संगूढ सांस्कृतिक व्यक्तिमत्व.
आणि सांगत सूट लोकांना
असशील खरा तर
तुझ्या रक्ताचे नागडे प्रकार
कंठातील किळसवाणे स्वर
तू एक माणूस आहेस माणूस
वस्त्रं उडवून एकांतात
स्वतःशीच करणारा निर्घृण खलबतं
पाशवी बलात्कार
आणि होळी
उजेडात उचललेल्या सामष्टिक मूल्यांची
तू एक माणूस, एक नाग जहरीला
एक वन्य रक्तपिपासू

क्वचितच एक कवी
उमटून नष्ट होणाऱ्या बुद्बुदासारखा
क्षणिक, स्वच्छ, सुंदर, सान, महान
एरवी एक माणूस
एक घाणच घाण साचलेला गढूळ डोह

१९६८

## नोटा मागणारे हात

मेलेले असतात तेव्हा
ह्या शद्बांतील गरळ उगळणारे उद्दाम भुजंग
संजीवनी झुरत असते
झिंगुर्ड्यांच्या शुष्ककाय झुडुपांवर
कशाचा वसंत, कशाची शरद्रजनी
मोळीत गोळा होऊन चुलीत जळत असतात
कल्पवृक्ष
जेव्हा हे नोटा मागणारे हात
मला त्रासून सोडतात
उद्ध्वस्त रस्त्यांच्या क्रूर क्रूरतर वळणावर
वाटतं व्यर्थ दवडले क्षण
सारस्वताची संभोगण्यात पानं
पानापानातील रज्जूचे उमरखय्याम आभास
आता डसताहेत
नळ्यानळ्यातून भक्ष शोधणाऱ्या
आशाळ अनवाणी हाताना

आणि हे नोटा मागणारे हात
थुंकताहेत
माझ्या कालिदास कवळलेल्या
कंगाल जिंदगानीवर.

१९६८

## जीवनाच्या वळणावर

जीवनाच्या वळणावर
अवेळीच झाली जर पानझडीला सुरुवात
सारखा लिहीतच राहीन तेव्हा
नुसत्या कविता....कविता....कविता....
पाखरं उडायच्या आधीच भरून घेईन
साऱ्या साऱ्या जातीचे स्वर
झडती घ्यायच्या आधीच होऊन जाईन
कोरा करकरीत रिता
आताशीच झालंय पहिलं पाणी
आयुष्याच्या आखाड तोंडी
पहिल्यांदाच चिरकली मुकी माती
कार्तीत कवळ्या पानांतून
मलाय गिरवू दे गड्या
ओल्या मातीवर रेघोट्या
खेळू दे मनसोक्त दाटुमुटीच्या खोप्यातून

१९६८

## विरामाचा क्षण

तुझा ठेवण्याला
प्रसन्न बहर
छेदीन अंतर कातळाचे

इतक्या आणीन
रसाच्या घागरी
मावू नये उरी मोद तुझ्या

माझ्या विरामाचा
असेल तो क्षण
जेथे तुझ्याहून गंगा वाहे

१९६८

## एक जिद्द !.... एक नाद !

शद्बासंगं लागलेला पाट आमचा
आमची मुलखावर उधळणारी जात
डोळे बुडतील तिथे ठोकतो पाल
आम्हाला कशाचा दिवस अन कशाची रात

काळीज भाजोस्तोर मरण गिळणारे आम्ही
मरणातय भोगतो हिर्वेगार निनाद
काळा गोटा लागल्यावरय खणतच असतो खोल
खोलच खोल जायची एक जिद्द ! एक नाद !

१९६८

## तकदीर

आमच्याय रक्तात आहेत यार
सळसळणारे अस्ली नाग
किस्मत खोटी म्हणून फिरतात दारोदार
चमचाभर दुधासाठी
गांवढळ गोट्यासंग बसतात कधी
नजर ठरत नसलेल्या रूपवान तंड्या
कधी कधी मातीलाय भीक मागतात
इरसाल मोती
हाडं कुपावर घाळून आम्हीय दाखवलं असतं
तेज आमचं
आमच्याच घरादाराच्या होळीत
आम्ही आमची परजली असती शक्ती
पण आम्ही तरी कुठं आहोत आमचे
चहूकडून होरपळलेलं तकदीर
खंडात घातलंय भोळ्या डोळ्यांनी
पंख नसलेल्या पाखरांसाठी

१९६९

## थोडा वेळ

थोडा वेळ अगदी थोडावेळ
माझ्यावरून सरकतो संध्येचा सोनेरी सूर्य
खडकाळ कडांना तेजोमय करीत
तेव्हा खांदा काढून नाटीखालचा
मीही आठवतो माझं नेस्तनाबूत
स्वछंदी हिंवेपण, माझा निरंकुश अनिर्बंध आत्मा
तेव्हा उठवतो तुटून वाळलेल्या कमळांना
आणि घेतो हामी पानांची केळींच्या
करतो खैरात रुकलेल्या, रुतलेल्यांना
गतीची आणि चढतो चढावर
तळ हातावर वादळ झेलीत
थोडावेळ अगदी थोडावेळ

१९६९

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे

## चिंतनं सत्य असली तरी

चिंतनात गाठलेली सगळी टोकं सत्य असली तरी....
असत्य नाहीत ह्या वाटा
जाणाऱ्या घराकडे
घरातून परतणाऱ्या
सिग्नल नसलेल्या तुफान गर्दीत
ह्या वाटा लगडाव्याच लागतात
अंगांगावर अंगार होईतो
कारण चिंतनं कितीही सत्य असली तरी
माणूस म्हणजे झाडपाला थोडाच आहे
तुटेल तेथून फुटायला
नव्या मुळ्या, नवी पानं, नवा वेध

REFBK-0022338
REFBK-0022338